मराठी अर्थशास्त्र परिषद

सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट-१८६० व मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट-१९५० अन्वये नोंदविलेली नोंदणी क्र.एफ-४६१५ मुंबई



४८ वा वार्षिक अहवाल

सन २०२५-२६

४८ वे वार्षिक अधिवेशन

२,३ व ४ नोव्हेंबर २०२५

आयोजक

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,अकोला.





प्राचार्य डॉ.रामेश्वर भिसे
अध्यक्ष



प्राचार्य डॉ.विकास सुकाळे
कार्याध्यक्ष



प्रा. डॉ.मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार



प्रा.डॉ.राहुल म्होपरे
संपादक-अर्थसंवाद



डॉ.राजाराम पाटील
सदस्य



डॉ.हनुमंत भोसले
सदस्य



डॉ.राजू शिंदे
सदस्य



डॉ.विठ्ठल ठावरी
सदस्य



डॉ.जितेंद्र तलवारे
सदस्य



डॉ.विजय भोपाळे
सदस्य



डॉ.धीरज कदम
सदस्य



डॉ.दीपक भुसारे
सदस्य



डॉ.लक्ष्मण सिताफुले
सदस्य



डॉ.विशाल पावसे
सदस्य



डॉ.मोहन सदामते
सदस्य



डॉ.संतोष कदम
स्वीकृत सदस्य



प्राचार्य डॉ.उल्हास माळकर
स्वीकृत सदस्य



डॉ.प्रविण बाबर
स्थानिक कार्यवाह



डॉ.धोंडीराम पवार
विश्वस्त



डॉ.गणेश गांवडे
विश्वस्त



डॉ.सुभाष दगडे
विश्वस्त

मनोगत

४९ वर्षांची गौरवशाली वाटचाल पूर्ण करणाऱ्या मराठी अर्थशास्त्र परिषदेला समृद्ध वैचारिक व ऐतिहासिक परंपरा लाभली आहे. महाराष्ट्राच्या पुरोगामी विचारधारेत अर्थशास्त्राच्या अभ्यासकांची सक्षम फळी निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य परिषदेने केले आहे. परिषदेचे आजीव सदस्य देशभरातील विविध राज्यांत तसेच विदेशातही कार्यरत आहेत. अशा प्रतिष्ठित संस्थेचा कार्यवाह-खजिनदार म्हणून कार्य करण्याची संधी मिळाल्याचा मला सार्थ अभिमान असून दोनही वेळा आपण माझी अविरोध निवड करून माझ्याप्रती जो विश्वास दाखविला आहे, मला वाटत माझ्या दृष्टीने तो लाख मोलाचा आहे.

या पदाची धुरा यापूर्वी आदरणीय प्रा. रविंद्र सबनीस, प्रा. व्य. सु. पाटणकर, डॉ. आ. गो. पुजारी, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्रा. चारूदत्त गोखले, डॉ. अनिल सूर्यवंशी आणि डॉ. राजेंद्र भांडवलकर यांनी निष्ठेने, शिस्तबद्ध पद्धतीने व आर्थिक नियोजनाच्या जाणिवेने सांभाळली. त्यांनी या पदाला उज्ज्वल परंपरा व आदर्श निर्माण करून दिले. त्यांच्या निःस्वार्थ कार्याबद्दल मी मनःपूर्वक आदर व्यक्त करतो.

४८ वर्षांच्या प्रदीर्घ वाटचालीत मराठी अर्थशास्त्र परिषदेने नावलौकिक प्राप्त करून राष्ट्रीय पातळीवर लोकमान्यता मिळविण्याच्या दिशेने यशस्वी वाटचाल केली आहे. सातत्याने राबविण्यात येणारे विविध उपक्रम, नियमितपणे आयोजित केले जाणारे वार्षिक अधिवेशन तसेच विविध पुरस्कार व पारितोषिकांच्या माध्यमातून परिषदेच्या परिवारातील घटकांना प्रोत्साहन देणारी मराठी अर्थशास्त्र परिषद ही एकमेवाद्वितीय संस्था ठरली आहे.

मराठी अर्थशास्त्र परिषद सुवर्णमहोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहे. परिषदेच्या या जडणघडणीत संस्थापक अध्यक्ष डॉ. नी. वि. सोवनी यांच्यासह डॉ. वि. म. दांडेकर, डॉ. श्री. आ. देशपांडे, डॉ. वि. वि. बोरकर, प्राचार्य या. शि. महाजन, डॉ. आनंद नाडकर्णी, डॉ. स. ह. देशपांडे, डॉ. वि. बा. घुगे, डॉ. ह. कृ. परांजपे, डॉ. रवींद्र सबनीस, डॉ. गि. सी. कल्याणकर, डॉ. नलिनी पंडित, डॉ. रवींद्र दोशी, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. ज. फा. पाटील, डॉ. शशिकांत गंधे, डॉ. व्य. सु. पाटणकर, डॉ. के. जी. पठाण, प्रा. शि. ना. माने, डॉ. भ.ग. बापट, डॉ. दि. व्य. जहागिरदार, डॉ. र. पु. कुरुलकर, डॉ. सु. दा. तुपे, डॉ. भालचंद्र मुणगेकर, डॉ. अ. रा. पडोशी, डॉ. संतोष दास्ताने, डॉ. सूर्यकांत जगदाळे, डॉ. मधुकर शिंदे, डॉ. सर्जेराव ठोंबरे, प्रा. दिलीप कदम, डॉ. पी. बी. कुलकर्णी, डॉ. व्ही. बी. भिसे, डॉ. विनायक देशपांडे, डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार, डॉ. आ. गो. पुजारी, डॉ. कैलास पाटील, प्राचार्य डॉ. जगन्नाथ पाटील, डॉ. श्रीराम जोशी, डॉ. सुहास आव्हाड, डॉ. शिवाजी भोसले, डॉ. रामचंद्र रसाळ, प्रा. चारुदत्त गोखले, डॉ. रामदास माहोरे, प्राचार्य डॉ. अनिल सूर्यवंशी, प्रा. डॉ. आर. बी. भांडवलकर, प्रा. डॉ. दिलीप अर्जुने, प्रा. डॉ. अनिलकुमार वावरे, प्रा. डॉ. विलास खंदारे आणि प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे या सर्वांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले आहे. त्यामुळे या सर्व मान्यवरांचा नामोल्लेख करणे अत्यंत आवश्यक आहे.

याबरोबरच परिषदेचे माजी व विद्यमान कार्याध्यक्ष, सर्व माजी कार्यवाह व खजिनदार, 'अर्थसंवाद'चे माजी व विद्यमान संपादक तसेच माजी व विद्यमान विश्वस्त यांचेही योगदान उल्लेखनीय आहे. परिषदेच्या कार्यकारी मंडळातील सर्व माजी व विद्यमान सदस्यांचे योगदानही अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे.

आपल्या या परिवारातील सर्व सन्माननीय सदस्यांचे बहुमोल योगदान परिषदेच्या आजवरच्या वाटचालीस लाभले आहे. या प्रसंगी मी सर्वांचे स्वागत करतो आणि सन २०२५-२६ या वर्षाचा ४८ वा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करीत आहे. कृपया या अहवालास मान्यता द्यावी, अशी विनंती करतो.

दिनांक ०२ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता मराठी अर्थशास्त्र परिषदेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नी. वि. सोवनी स्मृतीव्याख्यान या नाविन्यपूर्ण उपक्रमामध्ये पंधरावे पुष्प बँकिंग क्षेत्राचे अभ्यासक श्री. देविदास तुळजापुरकर यांनी गुंफले. 'बँकिंग उद्योगाचे लोकशाहीकरण' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्रा. डॉ. विलास खंदारे यांनी भूषविले. आपल्या मांडणीची सुरुवात करीत असताना सोवनी यांच्या स्मृतीना उजाळा दिला. आपल्या ओघवत्या शैलीत बँकिंग उद्योगाच्या संदर्भातील विविध दाखले देत या उद्योगाचे लोकशाहीकरण अत्यंत आवश्यक असून या क्षेत्राच्या वाढत्या

बाजारीकरणाच्या / खाजगीकरणाच्या काळात राष्ट्रीयीकरण किती आवश्यक असल्याचे आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीत त्यांनी दाखवून दिले. यावेळी परिषदेचे कार्यवाह - खजिनदार प्रा. डॉ. मारोती तेगमपुरे यांनी प्रा. नी. वि. सोवनी स्मृती व्याख्यानाचा उद्देश आणि त्यांचे मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या उभारणीतील योगदान या विषयीची मांडणी आपल्या प्रास्ताविकात केली. परिषदेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. विकास सुकाळे यांनी प्रमुख्य व्याख्याते तुळजापूरकर यांचा परिचय करून दिला. मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा. डॉ. विलास खंदारे यांच्या भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

परिषदेच्या ४० व्या वार्षिक अधिवेशनापासून परिषदेच्या माजी अध्यक्षांच्या योगदानाबाबत परिचय करून देणारे व्याख्यान आयोजित केले जाते. अकोला येथील अधिवेशनात दिनांक ४ नोव्हेंबर २०२५ रोजी परिषदेच्या अकराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. गि. सी. कल्याणकर यांच्या गौरवार्थ आयोजित व्याख्यानात प्राचार्य डॉ. सूर्यकांत जगदाळे यांनी 'डोनाल्ड ट्रम्प यांचे आयात धोरण - पायावर कुऱ्हाड की कुऱ्हाडीवर पाय' या उपरोधिक पण विचारप्रवर्तक विषयावर भाष्य केले. अमेरिकेच्या आयातनीतीचा जागतिक बाजारावर होणारा प्रभाव आणि भारतासाठी निर्माण होणाऱ्या संधी-आव्हानांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून एकूणच या विषयाचा त्यांनी यावेळी परामर्श घेतला. शेवटी डॉ. विलास खंदारे यांनी अध्यक्षीय समारोप केला.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या वतीने दिल्या जाणाऱ्या विविध पारितोषिकांचे वितरण समारोपाच्या सोहळ्यातील प्रमुख व मान्यवर पदाधिका-याच्या हस्ते करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) डॉ. संतोष कदम यांच्या 'अर्थसंकल्पाविषयी सर्वकाही' व डॉ. संजय ठिगळे यांच्या 'अर्थतरंग' या ग्रंथास विभागून देण्यात आले. प्रा.मो.स.भावे पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) अर्थसंवादमधील सर्वोत्कृष्ट लेखाबद्दल सुरज रामचंद्र चिगरे व रोहिदास अभंगे यांच्या 'डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान' (ऑक्टोबर-डिसेंबर २०२४, खंड ४८,अंक ३) आणि अमृत मनोहर चव्हाण व अतुल राजगुरू यांच्या 'सोलापूर जिल्ह्यातील कृषी जमिनीचा वाढता वापर आणि नगदी पिकांच आर्थिक अभ्यास.' (जुलै – सप्टेंबर २०२४, खंड ४८, अंक २) या लेखांना विभागून देण्यात आले. प्रा.सौ. अरुणा रारावीकर वृत्तपत्रातील आर्थिक विषयक लेखाला प्रथम पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) डॉ. कृष्णा शहाणे यांच्या 'कांदा किंमतीचे चक्रव्यूह भेदणार कसे' तर द्वितीय पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) डॉ. संजय ठिगळे यांच्या 'अशी ही फसवा फसवी' या लेखांसाठी देण्यात आला. डॉ. रविंद्र सबनीस आर्थिक लेख पारितोषिक (इंग्रजी माध्यमातून रु. ४०००/- व सन्मानपत्र) डॉ. माधव शिंदे व योगेश गोडबोले यांच्या Milk production in Ahmednagar District – Determinants of decline (Economic and Political Weekly, March 2024) या लेखांसाठी देण्यात आला. स्व. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथून पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात विद्यापीठातून प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यांस रु. २०००/- व सन्मानपत्र) दिले जाणारे पारितोषिक स्नेहा सुभाषराव भोयर यांना देण्यात आले. यावेळी अधिवेशन काळात सादरीकरण झालेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास पारितोषिके प्रदान करण्यात आले. यामध्ये कै. ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (रु. १०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाते. डॉ. उमेश भोकसे यांच्या 'महाराष्ट्रातील व्यसनाधीनतेचे सामाजिक व आर्थिक पैलू' व डॉ. होणाश्री पाटील यांच्या 'डॉ. मनमोहन सिंग – एक प्रभावशाली अर्थशास्त्रज्ञ' या विषयावरील शोधनिबंधास विभागून देण्यात आले. प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (रु. ५००/- व सन्मानपत्र) सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास दिले जाणारे पारितोषिक डॉ. नयना भीमराव पाटील यांच्या 'भारतीय भाग बाजार – जोखीम आणि परतावा अभ्यास' या विषयावरील शोधनिबंधास देण्यात आले. डॉ. ज.फा. पाटील पारितोषिक (रु.२०००/- व सन्मानपत्र) अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (विद्यार्थ्यांकरिता) **अनिल खरात** यांच्या**' डॉ. मनमोहन सिंग यांचे अर्थशास्त्रीय योगदान' व स्वाती पाटील** यांच्या **'सोशल मिडिया व्यसनाधीनता एक सामाजिक समस्या'** या शोधनिबंधास विभागून देण्यातआला. पद्मजा गंधे पारितोषिक अधिवेशन काळात सादर करण्यात आलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (महिलेसाठी – पारितोषिक व सन्मानपत्र रु.१०००/-) दिले जाणारे पारितोषिक डॉ. प्राजक्ता पोहरे यांच्या 'जोखीम आणि परताव्याचे आर्थिक सिद्धांत' या शोधनिबंधास देण्यात आला.

कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर पारितोषिक रु. १५०००/- अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (पारितोषिक व सन्मानपत्र) महिला आजीव सभासदांकरिता (डॉ. तृप्ती कवळे यांच्या 'आरोग्य क्षेत्रातील जोखीम आणि परताव्याचे सैद्धांतिक विवेचन 'व प्रा. ज्योती प्रदीप भोई यांच्या 'महाराष्ट्रातील भिवंडी तालुक्यातील तरुणांच्या व्यसनाधीनतेचा त्यांच्या सामाजिक व आर्थिक स्तरावर झालेल्या परिणामांचा चिकित्सक अभ्यास' या शोधनिबंधास विभागून देण्यात आला.

कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर पारितोषिक रु. १५०००/- अधिवेशन काळात सादर केलेल्या सर्वोत्कृष्ट शोधनिबंधास (पारितोषिक व सन्मानपत्र) पुरुष आजीव सभासदांकरिता (डॉ. विशाल करपे यांच्या 'भारताच्या आर्थिक विकासात डॉ. मनमोहन सिंग यांचे योगदान 'या शोधनिबंधास देण्यात आला.

अकोला येथील मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४९ व्या वार्षिक अधिवेशनाच्या अध्यक्षपदी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे (अकोला) यांची अविरोध निवड करण्यात आली. विश्वस्त डॉ. विठ्ठल घिनमिने यांची मुदत दि. ३१ मार्च २०२६ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या तीन वर्षासाठी विश्वस्त म्हणून डॉ. सुभाष दगडे यांची अविरोध निवड करण्यात आली. दिनांक ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळावर प्रा. सदामते मोहन गोविंद - शिवाजी विद्यापीठ ,कोल्हापूर, प्रा. पावसे विशाल भाऊसाहेब - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, प्रा. सिताफुले लक्ष्मण सटवाजी - मुंबई विद्यापीठ, मुंबई यांची अविरोध निवड झाली.

मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ज्येष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन, पदाधिकारी आणि विश्वस्तांचा सल्ला, कार्यकारणी सदस्यांचे सहकार्य, जाहिरातदार व वर्गणीदार यांचे आर्थिक पाठबळ, सत्राध्यक्ष, सूत्रसंचालक, वृत्तलेखक व तज्ज्ञ परीक्षक यांची निरपेक्ष सेवा आणि समस्त आजीव सदस्यांचे सहकार्य यामुळे आपल्या परिषदेचा नावलौकिक वृद्धिंगत होत आहे. मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या ४९ व्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन विटा ता. खानापूर जि. सांगली येथे **दिनांक १३, १४ व १५ नोव्हेंबर २०२६** रोजी करण्यात आले असून या अधिवेशनाचे आपणास आग्रहपूर्वक निमंत्रण..

धन्यवाद!

आपलाच स्नेहांकित
डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

मनुष्याणांम् वृत्तिरर्थ:

मराठी अर्थशास्त्र परिषद
४९ वे वार्षिक अधिवेशन
१३, १४ व १५ नोव्हेंबर २०२६
बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली

४९ वी वार्षिक साधारण सभा

सूचना

मराठी अर्थशास्त्र परिषदेवी ४९ वी वार्षिक साधारण सभा दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रविवार रोजी दुपारी १२:३० वाजता बलवंत कॉलेज, विटा ता.खानापूर जि. सांगली येथे पुढील कामकाजासाठी प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे, अकोला यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केली आहे. आपण या सभेस उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

स्थळ : अंबड

दिनांक : २३ ऑक्टोबर, २०२६

आपलाच स्नेहांकित

डॉ.मारोती विरभद्र तेगमपुरे

कार्यवाह खजिनदार

१. दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करणे.
२. दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ मंगळवार रोजी दुपारी १२:३० वाजता श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे संपन्न झालेल्या ४८ व्या वार्षिक साधारण सभेच्या इतिवृत्तास मंजूरी देणे. (जोडपत्र क्र. ००) पृष्ठ क्र. ०५
३. कार्यवाह - खजिनदारांनी सादर केलेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाचा अहवाल स्वीकारणे (जोडपत्र ०१) पृष्ठ क्र. ०७
४. अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांचा अहवाल स्वीकारणे. (जोडपत्र ०२) पृष्ठ क्र. ०८
५. परिषदेच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या हिशेबास (ताळेबंद) मंजूरी देणे (जोडपत्र ०३) पृष्ठ क्र. ०९.
६. परिषदेच्या व अर्थसंवादच्या सन २०२६-२७ या वर्षांच्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे (जोडपत्र ०५अ/आ) पृष्ठ क्र. १२.
७. परिषदेच्या सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी लेखा परीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
८. परिषदेच्या ५० व्या (सुवर्ण महोत्सवी अधिवेशन) वार्षिक अधिवेशनाचे स्थान व चर्चासत्राचे विषय निश्चित करणे.
९. विश्वस्त डॉ. धोंडीराम भोजू पवार यांची मुदत ३१ मार्च २०२७ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२७ ते दिनांक ३१ मार्च २०३० या तीन वर्षासाठी एका विश्वस्तांची निवड करणे.
१०. कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे यांची मुदत ३१ मार्च २०२४ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक ०१ एप्रिल २०२७ ते दि. ३१ मार्च २०३० या तीन वर्षासाठी कार्यवाह-खजिनदार यांची निवड करणे.
११. परिषदेच्या दि. ०१ एप्रिल २०२७ ते ३१ मार्च, २०२८ या एका वर्षासाठी अध्यक्षांची निवड करणे.
१२. ०१ एप्रिल २०२७ ते दि. ३१ मार्च २०३० या तीन वर्षांसाठी कार्यकारी मंडळावर सदस्यांची निवड करणे. मुदत संपणाऱ्या सदस्यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.
    १. डॉ. ठावरी विठ्ठल निळकंठराव, (१ ते १० विद्यापीठ वगळता इतर विद्यापीठ)
    २. डॉ. जितेंद्र दगडू तलवारे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव. .
    ३. डॉ. राजाराम केरबा पाटील, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर विद्यापीठ, सोलापूर.
    ४. भोसले हनुमंत अंकुशराव, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
    ५. शिंदे राजू कथ्थू, एस एन डी टी महिला विद्यापीठ, मुंबई.
१३. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करणे.

महत्त्वाच्या सूचना

१. गणपूर्ती अभावी वार्षिक साधारण सभा १५ मिनिटे तहकूब करून पुन्हा त्याच ठिकाणी सुरू होईल,अशा वेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

२. कृपया सभेला येतांना वार्षिक अहवाल सोबत आणावा. (परिषदेच्या संकेतस्थळावर अहवाल उपलब्ध आहे.)

३. परिषदेच्या विविध पदाच्या रिक्त जागांसाठी निवडणूकीचे अर्ज कार्यवाह - खजिनदार यांच्या अंबड जि.जालना येथील कार्यालयात मिळतील. प्रत्येक अर्जाची किंमत कार्यकारणी सदस्य पदासाठी १०००/- रुपये आणि अध्यक्ष, कार्यवाह-खजिनदार, विश्वस्त पदांसाठी २०००/- रुपये आहे. इच्छुकांनी मागणी केल्यास संबंधितांना अर्ज पाठविण्यात येईल.

४. उमेदवारी अर्ज कार्यवाह-खजिनदार यांचेकडे **दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी दुपारी १२:३० वाजेपर्यंत** अधिवेशन स्थानी स्वीकारले जातील. त्यानंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

५. दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी किंवा त्यापूर्वी ज्या व्यक्ती परिषदेच्या आजीव सभासद झाल्या असतील, अशा सदस्यांनाच निवडणूक प्रक्रियेत भाग घेता येईल. आजीव सभासद क्र. २०७५ पर्यंतचे सदस्यच फक्त निवडणूकीला उभे राहण्यास व मतदान करण्यास पात्र आहेत.

६. मतदान प्रक्रियेत सहभागी होताना आजीव सदस्यांजवळ स्वतःचे छायाचित्र असलेले ओळखपत्र असणे आवश्यक आहे. यामध्ये आधारकार्ड, मतदानकार्ड (शासनाचे), पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स, महाविद्यालयाचे प्राचार्यांनी दिलेले छायाचित्र असणारे ओळखपत्र यापैकी कोणतेही एक असणे आवश्यक आहे.

७. वार्षिक वृत्तांत, ताळेबंद, आय-व्यय पत्र या संबंधीचे व साधारण सभेत विचारावयाचे प्रश्न सदस्यांना परिषदेच्या कार्यालयाकडे (कार्यवाह) किमान ०५ दिवस अगोदर लेखी स्वरुपात पाठवावे लागतील.

डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह - खजिनदार

प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे
अध्यक्ष

४८ व्या वार्षिक साधारण सभेचे इतिवृत्त

(जोडपत्र क्र. 00)

मराठी अर्थशास्त्र परिषदेची ४८ वी वार्षिक साधारण सभा मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष प्रा.डॉ. विलास खंदारे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०४ नोव्हेंबर २०२५ मंगळवार रोजी दुपारी १२:३० वाजता श्री. शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला येथे संपन्न झाली.

१.) सभेच्या सुरुवातीला परिषदेच्या दिवंगत सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्याचा प्रस्ताव कार्यवाह-खजिनदार यांनी मांडल्यानंतर सभागृहाने उभे राहून मौन पाळून श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर रितसर कामकाजास सुरुवात झाली. या सभेत पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

२.) शनिवार दिनांक ०१ फेब्रुवारी २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथे संपन्न झालेल्या व्या वार्षिक साधारण सभेचे इतिहत कार्यवाह-खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी वाचून दाखवले त्यास चर्चा करून मान्यता देण्यात आली. ठराव मंजूर

३.) कार्यवाह-व्खजिनदारांनी सादर केलेला २०२४-२५ आर्थिक वर्षाचा अहवाल साधारण सभेने एकमताने स्विकारला व मान्यता देण्यात आली. ठराव मंजूर

४.) अर्थसंवादच्या प्रमुख संपादकांनी सादर केलेला २०२४-२५या आर्थिक वर्षाचा अहवाल अहवाल साधारण सभेने एकमताने स्विकारला व मान्यता देण्यात आली. ठराव मंजूर

५.) परिषदेच्या २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या हिशोबास (ताळेबंद) मंजूरी देण्यात आली. ठराव मंजूर.

६.) परिषदेच्या व अर्थसंवादच्या स.न. २०२६-२७ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देण्यात आली. ठराव मंजूर

७.) परिषदेच्या सन २०२६-२७ या भार्थिक वर्षासाठी लेखा परिक्षकांची नेमणूक व मेहनताना ठरविण्याचा अधिकार कार्यवाह – खजिनदार यांना देण्यात आला. ठराव मंजूर

८.) परिषदेच्या ४९ व्या वार्षिक अधिवेशनाचे यजमानपद रयत शिक्षण संस्थेचे बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली, यांना देण्यात यावा असा ठराव साधारण सभेने एकमताने पारीत केला. यावेळी ४९ व्या अधिवेशनासाठी चर्चासत्रासाठीचे विषय पुढील प्रमाणे निश्चि -त करण्यात आले.

१.) व्यापार चक्राची सैद्धांतिक चिकित्सा.

२.) निती आयोगाच्या परिप्रेक्षातील भारताच्या आर्थिक धोरणांची मिमांसा.

३.) पर्यावरणीय बदल आणि महाराष्ट्राची अर्थव्यवस्था.

उपरोक्त विषयावर चर्चा होऊन एकमताने मंजूर करण्यात आले. ठराव मंजूर.

९.) परिषदेचे विश्वस्त डॉ. घिनमीने विठ्ठल मानिकराव यांची मुदत ३१ मार्च २०२६ रोजी पूर्ण होत आहे. दिनांक १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या तीन वर्षासाठी परिषदेचे विश्वस्त म्हणून प्रा. सुभाष दिगंबर दगडे यांची अविरोध निवड करण्यात आली. ठराव मंजूर

१०.) परिषदेचे अध्यक्ष प्रा. विलास भिकाजी खंदारे, यांची मुदत दि. ३१ मार्च २०२६ रोजी पूर्ण होत असल्यामुळे दिनांक १ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२७ या एका वर्षाकरिता परिषदेचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. रामेश्वर मा. भिसे यांची अविरोध निवड करण्यात आली. ठराव मंजूर

११.) ०१ एप्रिल २०२६ ते ३१ मार्च २०२९ या तीन वर्षासाठी कार्यकारी मंडळावर तीन सदस्यांची निवड करणे. मुदत संपणाऱ्या सरस्यांचे नावे- १) डॉ. जयवंत इंगळे (शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर) २) डॉ. सुभाष सावंत (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.) ३.) डॉ. बाळासाहेब पाटील (मुंबई विद्यापीठ, मुंबई) अविरोध निवड करण्यात आलेल्या तीन सदस्यांची नावे - १) प्रा. सदामते मोहण गोविद (शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर) 2). प्रा. पावसे विशाल भाऊसाहेब (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे) ३) प्रा. सिताफूले लक्ष्मण सटवाजी (मुंबई विद्यापीठ, मुंबई) ठराव मंजूर.

१२.) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयावर चर्चा करून पुढील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

१२.१) अर्थसंवाद ५० वा खंड लवकरच प्रकाशित करेल त्यावर पन्नास वर्षाचा लोगो छापण्याची अनुमती यावेळी संपादकांना देण्यात आली. ठराव मंजूर.

१२.२) सामाजिक शास्त्र विषयाचे महामंडळ निर्माण करण्याच्या संदर्भात मराठी अर्थशास्त्र परिषदेने पुढाकार घ्यावा या संदर्भातील सविस्तर टिपण (डॉ. संतोष दास्ताने - माजी अध्यक्ष मराठी अर्थशास्त्र परिषद यांचा प्रस्ताव) कार्यवाह-खजिनदारांनी कार्यकारी मंडळास सादर केल्याची माहिती अध्यक्ष डॉ. विलास खंदारे यांनी सभेस दिली. यावर या प्रस्तावाची नोंद घेण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. ठराव मंजूर.

सभेच्या शेवटी कार्यवाह खजिनदार डॉ. मारोती तेगमपुरे यांनी सर्वांचे आभार मानले. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

डॉ. मारोती विरभद्र तेगमपुरे
कार्यवाह - खजिनदार

प्राचार्य डॉ. विलास खंदारे
अध्यक्ष

मनुष्याणांम् वृत्तिरर्थ:

अ) मराठी अर्थशास्त्र परिषद लेखापरीक्षण अहवाल : (जोडपत्र क्र ०१)

खर्च	**३१ मार्च २०२५ रक्कम**	**३१ मार्च २०२६ रक्कम**	**उत्पन्न**	**३१ मार्च २०२५ रक्कम**	**३१ मार्च २०२६ रक्कम**
टपाल खर्च	२,३५०.००	९,१००.००	बचत खात्यावरील व्याज	२६,०७९.००	५,३३७.००
स्टेशनरी, छपाई व अंक संकेतस्थळावर सोडणे.	९,९१४.००	८,४८५.००	सभासद सुची	१२,१००.००	३,९००.००
बँक कमिशन	२८७.८८	१२.००	गुंतवणूकीवरील व्याज	२,७०,९११.००	२,३७,६७३.००
झेरॉक्स	२९७९.००	२,१७०.००	निवडणूक अर्ज विक्री	३५,३००.००	२०,०००.००
प्रवास खर्च	३३८००.००	२७,६००.००	इमारत निधी	८८,०००.००	२२,०००.००
मानधन मदतनीस/ लेखणीस	५०००.००	५,०००.००	आजीव सभासद वर्गणी	३,६३,०००.००	१,१७,०००.००
प्रिंटींग व इतर टायपिंग	३२००.००	१४,१८७.००	इतर जमा	५,०११.००	५,०००.००
किरकोळ खर्च	२७००.००	१६,१९०.००	रामसेठ ठाकूर ठेव	२०,००००.००	-
व्याख्यानमाला व पारितोषिके	५६३००.००	१,१८,५००.००	-	-	-
अधिवेशन खर्च आणि मानधन	१३,०००.००	१३,७००.००	-	-	-
कार्यालय वीजबील	१६९०.००	३,१००.००	-	-	-
मुख्यमंत्री सहाय्यता निधी करिता देणगी	-	३,६२,८८०.००	मुख्यमंत्री सहाय्यता निधी करिता जमा		३,६२,८८०.००
अर्थसंवाद जुने अंक स्कॅन करणे	३,०००.००	-	-	-	-
मुदत ठेव	२३,५०,०००.००	५,००००.००	मुदत ठेव मोड	-	५,००,०००.००
ज्यादा उत्पन्न	३०,६,१८०.००	६०,५६६.००	-	-	-
एकूण रुपये	**२८,००,४०१.००**	**११,६८,४९०.००**	**एकूण रुपये**	**२८,००,४०१.००**	**११,६८,४९०.००**

स्थळ : अंबड
दिनांक : २३/१०/२०२६

सही
डॉ. मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

सही
धनंजय मस्के &असोसीएटस
सनदी लेखापाल

ब) अर्थसंवाद लेखापरीक्षण अहवाल (जोडपत्र क्र.०२)

खर्च	**३१ मार्च २०२५ रक्कम**	**३१ मार्च २०२६ रक्कम**	**उत्पन्न**	**३१ मार्च २०२५ रक्कम**	**३१ मार्च २०२६ रक्कम**
अर्थसंवाद छपाई व कागद	१,७७,६३२.००	१,७४,५०८.००	अर्थसंवाद वर्गणी व जाहीरात	९४,७८०.००	८०,००२.०० ०
बँक कमिशन	१६१.८८	११.८०	म.रा.सा.सं.मंडळ मुंबई	४५,०००.००	४५,०००.००
सहाय्यक मानधन	२,५००.००	२,५००.००	अर्थसंवाद तुट	५७,४६३.८८	१,०७,५०१.००
स्टेशनरी व इतर	२९०.००	-			
पोस्टेज	६,२८०.००	६,५३५.००			
प्रिंटींग व इतर टायपिंग	३,५२०.००	२,३६०.००			
झेरॉक्स	१,८८०.००	१,८३०.००			
प्रवास खर्च	४,९८०.००	४,९५५.००			
	-	९२,७१७.२०			
एकूण रुपये =	**१,९७,२४३.८८**	**२,८५,४१७.००**	**एकूण रुपये =**	**१,९७,२४३.८८**	**२,८५,४१७.००**

स्थळ : अंबड
दिनांक : २३/१०/२०२६

सही
डॉ. मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

सही
धनंजय मस्के &असोसीएटस
सनदी लेखापाल

मनुष्याणांम् वृत्तिरर्थ:

मराठी अर्थशास्त्र परिषद
४९ वे वार्षिक अधिवेशन
१३, १४ व १५ नोव्हेंबर २०२६
बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली

मराठी अर्थशास्त्र परिषद -ताळेबंद (जोडपत्र क्र.०३)

वर्ष		रक्कम		रक्कम	
		दि. ३१ मार्च २०२५		दि.३१ मार्च २०२६	
स्थायी निधी			**७८,५१७,०६.००**		**७८,५१७,०६.००**
आजीव सदस्य	मागील	**२७,६०,२७९.००**		३१,३२,२७९.००	
	जमा	३,६३,०००.००		१,१७,०००.००	
			३१,३२,२७९.००		**३२,४९,२७९.००**
प्रकाशन निधी			७८,६०७.०७		७८,६०७.०७
अर्थसंवाद स्थायी निधी			**३,३४,३५३.००**		**३,३४,३५३.००**
इमारत निधी	मागील	**१२,५६,०६९.००**		१३,४४,०६९.००	
	जमा	८८,०००.००		२२,०००.००	
			१३,४४,०६९.००		**१३,६६,०६९.००**
पारितोषिके व पुरस्कार उपक्रम					
धुळे व्याख्यानमाला निधी		७,५००.००		७,५००.००	
स्व. जमनालाल बजाज उपक्रम निधी		७५,०००.००		७५,०००.००	
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा वि. ग्रंथ पारितोषिक निधी		१०,०००.००		१०,०००.००	
मो.स.भावे पारितोषिक निधी		५,०००.००		५,०००.००	
कै.ग.प्र.पिंपरकर पारितोषिक निधी		१३,५००.००		१३,५००.००	
डॉ. रविंद्र सबनीस निधी		५०,०००.००		५०,०००.००	
डॉ.के.एच.ठक्कर पारितोषिक निधी		६,०००.००		६,०००.००	
श्रीमती पद्मजा गंधे पारितोषिक निधी		२५,०००.००		२५,०००.००	
डॉ.ज.फा.पाटील पारितोषिक निधी		२५,०००.००		२५,०००.००	
मातोश्री बयाबाई श्री.कदम पारितोषिक निधी		२,००,०००.००		२,००,०००.००	
सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार		२५,०००.००		२५,०००.००	
प्रा. नि.वी.सोवनी स्मृती व्याख्यान निधी		१,६४,५५०.००		१,६४,५५०.००	
डॉ.सुधा मोकाशी पारितोषिक निधी		१,००,०००.००		१,००,०००.००	
स्व.प्रा.भास्कर ढाले पुरस्कार निधी		३०,०००.००		३०,०००.००	
डॉ. शंकर मोडक पुरस्कार निधी		१,००,०००.००		१,००,०००.००	
			८,३६,५५०.००		**८,३६,५५०.००**
अग्रिम सुचीकरीता	मागील	**२५६००.००**		**२७,७००.००**	
	जमा	१,५००.००		३,९००.००	
			२७,७००.००		**३१,६००.००**
अर्थसंवाद तुट निधी					
इतर देणे	मागील	**२५,९३३.००**			
	जमा	९७,९३३.००			
		१,०८,३३५.००		३३,९१०.००	
	अधिक चालू	-८३,४०२.००			
			२५,९३३.००		**७९,९८७.००**
डॉ.आर.एस.सोळुंके व्याख्यानमाला ठेव			**५००००.००**		**५००००.००**
रामसेठ ठाकूर ठेव			२०,००००.००		२०,००००.००
उत्पन्न खर्च हिशोब मागील ताळेबंदाप्रमाणे		२४,०९,४५१.००		२६,१६,३८८.००	
अधिक चालू वर्षाची वाढ (Capital Receipt 15500)		२,०६,९३७.००		२,४६,५८०.००	
			२६,१६,३८८.००	-	
			१,०९,७४,८१६.१३		**१,६३,२८,१५१.०७**

स्थळ : अंबड
दिनांक : २३/१०/२०२६

सही
डॉ. मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

सही
धनंजय मस्के & असोसीएटस
सनदी लेखापाल

मराठी अर्थशास्त्र परिषद

ई) ठेव गुंतवणूक पत्र (जोडपत्र क्र.०४)

(ठेव गुंतवणूक ३१ मार्च अखेरची)

अ.क्र.	बँकेचे नाव	प्रमाणपत्र क्रमांक	रक्कम ३१ मार्च २०२५	रक्कम ३१ मार्च २०२६
१.	बँक ऑफ इंडिया ,पुणे	३६०३	२,७६,७९९.२९	२,७६,७९९.२९
२.	बँक ऑफ इंडिया ,पुणे	९४५२	८,०४,६२२.१८	८,०४,६२२.१८
३.	बँक ऑफ इंडिया ,पुणे	५६२७	१५,००,०००.००	१५,००,०००.००
४.	बँक ऑफ इंडिया ,पुणे	५०३५३७१०००००१६१	३,४७,५१३.००	३,४७,५१३.००
५.	बँक ऑफ इंडिया ,पुणे	५०३५३७१०००००२९३	८०,०००.००	८०,०००.००
६.	बँक ऑफ इंडिया ,पुणे	५०३४५११००१३९८८	१,०९,६४५.००	१,०९,६४५.००
७.	स्टेट बँक ऑफ ,मुंबई	३००५४८९५२५६	५५,०००.००	५५,०००.००
८.	टाटा इनकम फंड	T-१-०००००२८५९३५३८	२०,१२२.००	२०,१२२.००
९.	युटीआय (सीआरटीएस)	१९९२१२१३/०३४४	१,५०,७००.००	१,५०,७००.००
१०.	आय.डी.बी.आय. मुंबई	७१०७०००००३४८१२	५०,०००.००	५०,०००.००
११.	कॅनरा बँक, अंबड	१४०१३४३१७७६६/१	३,०३,०१२.००	३,०३,०१२.००
१२.	कॅनरा बँक, अंबड	१४०१३४३१७७६६/२	५०,३३९.००	५०,३३९.००
१३.	कॅनरा बँक, अंबड	४०१०००१६८	१०,७३,८६७.००	१०,७३,८६७.००
१४.	बँक ऑफ महाराष्ट्रा, अंबड	६०४८५८९४२३६	५,००,०००.००	-
१५.	कॅनरा बँक, अंबड	१३००४८८५४१३६/१	७,००००.००	७,००००.००
१६.	कॅनरा बँक, अंबड	१३००४८८५५५४९/१	७,००००.००	७,००००.००
१७.	कॅनरा बँक, अंबड	१३००४८८५५७५५/१	६,००००.००	६,००००.००
१८.	कॅनरा बँक, अंबड	१४०२२०३५८३७३/१	२,५०,०००.००	२,५०,०००.००
१९.	कॅनरा बँक, अंबड	१३००४८८५६०५५/१	१,००००.००	१,००००.००
२०.	बँक ऑफ महाराष्ट्रा, अंबड	६०५५८१५२१२३	-	५,००,०००.००
	एकूण		**७६,६८,२६८.५०**	**७८२८२०७.४७**

स्थळ : अंबड
दिनांक : २३/१०/२०२६

सही
डॉ. मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

सही
धनंजय मस्के &असोसीएटस
सनदी लेखापाल

मनुष्याणांम् वृत्तिरर्थः

मराठी अर्थशास्त्र परिषद

ताळेबंद (जोडपत्र क्र. ०५)

जिंदगी		रक्कम		रक्कम	
		दि. ३१ मार्च २०२५		दि. ३१ मार्च २०२६	
मुदतठेव व गुंतवणूक			**७६,६८,२६८.००**	**७८,८४,२३५.००**	**७८,८४,२३५.००**
रोख बँकेतील शिल्लक					
स्टेट बँक ऑफ इंडिया, मुंबई		४५,३२४.८४		४५,३२४.८४	
बँक ऑफ इंडिया, पुणे		८,५०,९४६.२४		९,९२,०४१.४१	
बँक ऑफ इंडिया, कोहापूर		१,२८,१४१.६४		२,२०,८५८.८४	
कॅनरा बँक अंबड		९०,९००.००		१,३०,०१९.२८	
बँक ऑफ महाराष्ट्रा,अंबड			**११,१५,४०२.२८**	४२,९८१.००	**१४,३१,२२४.४७**
व्याजावरील TDS	मागील	२,३७,५९३.००		२,६४,६८५.००	
	चालू	२७,०९२.००		२१,८२१.००	
	एकूण			-	
	परत			-	
			२६,४६,८५.००		**२,८६,५०६.००**
Building Office			**१७,२५,०००.००**		**१७,२५,०००.००**
एकूण रुपये			**१,०७,७३,३५५.२८**		**१,१३,२६,९६६.००**

स्थळ : अंबड
दिनांक : २३ /१०/२०२६

सही
डॉ. मारोती तेगमपुरे
कार्यवाह-खजिनदार

सही
धनंजय मस्के & असोसीएटस
सनदी लेखापाल

मनुष्याणांम् वृत्तिरर्थ:

मराठी अर्थशास्त्र परिषद
४९ वे वार्षिक अधिवेशन
१३, १४ व १५ नोव्हेंबर २०२६
बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली

मराठी अर्थशास्त्र परिषद अंदाजपत्रक

(जोडपत्र क्र.०५/ अ) २०२६-२७

खर्च	रक्कम ३१ मार्च	उत्पन्न	रक्कम ३१ मार्च
प्रवास खर्च	२८,०००.००	साधारण शुल्क	१,२००.००
हिशोब लिहिण्याचा मेहनताना	७,०००.००	बचत खात्यावरील व्याज	२६,०००.००
लेखापरीक्षण शुल्क	१२,०००.००	मुदत ठेवीवरील व्याज	३,५०,०००.००
बँक कमिशन	१२००.००	निवडणूक अर्ज विक्री	२०,०००.००
मानधन	६०००.००	प्रतिनिधी शुल्क	१५,०००.००
टपाल खर्च	१५,०००.००	आजीव सभासद नोंदणी	१,५०,०००.००
अहवाल छपाई व कागद	१३,०००.००		
स्टेशनरी	६,०००.००		
व्याख्यानमाला व पारितोषिक किरकोळ खर्च	१,१०,०००.००		
टायपिंग व झेरॉक्स खर्च	१०,०००.००		
कार्यलय वीजबिल स्वच्छता	६,०००.००		
परिषदेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन व त्यासाठीचा खर्च	१,००,०००.००		
ज्यादा उत्पन्न	२,४८,०००.००		
एकूण रुपये	५,६२,२००.००	**एकूण रुपये**	५,६२,२००.००

स्थळ : अंबड — सही — सही

दिनांक : २३/१०/२०२६ — **डॉ. मारोती तेगमपुरे** — **धनंजय मस्के & असोसीएटस**

कार्यवाह-खजिनदार — सनदी लेखापाल

मराठी अर्थशास्त्र परिषद अंदाजपत्रक

(जोडपत्र क्र.०५/ आ) २०२७ – २८

खर्च	रक्कम ३१ मार्च	उत्पन्न	रक्कम ३१ मार्च
अर्थसंवाद छपाई	२,२०,०००.००	अर्थसंवाद वर्गणी	८०,०००.००
स्टेशनरी	४,५००.००	जाहिरात	१,६०,०००.००
टपाल खर्च	७,०००.००	म.रा.सा.स.मंडळ,मुंबई	४५,०००.००
मानधन	२५००.००	बँक व्याज	६००.००
प्रवास खर्च (पेट्रोल खर्चासहीत)	५,०००.००		
बँक कमिशन	५००.००		
झेरॉक्स	३,०००.००		
प्रिटींग व टायपिंग	४,५००.००		
ज्यादा उत्पन्न	३८,६००.००		
एकूण रुपये	**२,८५,६००.००**	**एकूण रुपये**	**२,८५,६००.००**

स्थळ : अंबड — सही — सही

दिनांक : २३/१०/२०२६ — **डॉ. मारोती तेगमपुरे** — **धनंजय मस्के & असोसीएटस**

कार्यवाह-खजिनदार — सनदी लेखापाल

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष

अधिवेश	नांव	वर्ष	अधिवेशन	नांव	वर्ष
१ ले	डॉ. नी.वि.सोवनी	१९७७-७८	२६ वे	डॉ. संतोष दास्ताने	२००२-०३
२ रे	डॉ. वि.म.दांडेकर	१९७८-७९	२७ वे	डॉ. सूर्यकांत जगदाळे	२००३-०४
३ रे	डॉ. श्री.आ.देशपांडे	१९७९-८०	२८ वे	डॉ. मधुकर शिंदे	२००४-०५
४ थे	डॉ.वि.वि.बोरकर	१९८०-८१	२९ वे	डॉ. सर्जेराव ठोंबरे	२००५-०६
५ वे	प्राचार्य या.शि.महाजन	१९८१-८२	३० वे	प्रा. दिलीप कदम	२००६-०७
६ वे	डॉ.आनंद नाडकर्णी	१९८२-८३	३१ वे	डॉ. पी.बी. कुलकर्णी	२००७-०८
७ वे	डॉ. स.ह. देशपांडे	१९८३-८४	३२ वे	डॉ. व्ही.बी. भिसे	२००८-०९
८ वे	डॉ. वि.बा.घुगे	१९८४-८५	३३ वे	डॉ. विनायक देशपांडे	२००९-१०
९ वे	डॉ. ह.कृ.परांजपे	१९८५-८६	३४ वे	डॉ. सौ. मुक्ता जहागिरदार	२०१०-११
१० वे	डॉ. रवींद्र सबनीस	१९८६-८७	३५ वे	डॉ. आ.गो.पुजारी	२०११-१२
११ वे	डॉ. गि. सी.कल्याणकर	१९८७-८८	३६ वे	डॉ. कैलास पाटील	२०१२-१३
१२ वे	डॉ. नलिनी पंडित	१९८८-८९	३७ वे	प्राचार्य डॉ.जगन्नाथ पाटील	२०१३-१४
१३ वे	डॉ. रविंद्र दोशी	१९८९-९०	३८ वे	डॉ. श्रीराम जोशी	२०१४-१५
१४ वे	डॉ.श्रीनिवास खांदेवाले	१९९०-९१	३९ वे	डॉ. सुहास आव्हाड	२०१५-१६
१५ वे	डॉ. ज.फा. पाटील	१९९१-९२	४० वे	डॉ. शिवाजी भोसले	२०१६-१७
१६ वे	डॉ. शशिकांत गंधे	१९९२-९३	४१ वे	डॉ. रामचंद्र रसाळ	२०१७-१८
१७ वे	डॉ. व्य.सु.पाटणकर	१९९३-९४	४२ वे	प्रा. चारुदत्त गोखले	२०१८-१९
१८ वे	डॉ. के.जी. पठाण	१९९४-९५	४३ वे	डॉ. रामदास माहोरे	२०१९-२०
१९ वे	प्रा. शि.ना. माने	१९९५-९६	४४ वे	प्राचार्य डॉ. अनिल सुर्यवंशी	२०२०-२२
२० वे	डॉ. भ.ग. बापट	१९९६-९७	४५ वे	डॉ. आर.बी. भांडवलकर	२०२२-२३
२१ वे	डॉ. दि.व्य. जहागिरदार	१९९७-९८	४६ वे	डॉ. दिलीप सोपानराव अर्जुने	२०२३-२४
२२ वे	डॉ. र.पु. कुरुलकर	१९९८-९९	४७ वे	डॉ. अनिलकुमार कृष्णराव वाव्हरे	२०२४-२५
२३ वे	डॉ. सु.दा.तुपे	१९९९-००	४८ वे	डॉ. विलास भिकाजी खंदारे	२०२५-२६
२४ वे	डॉ. भालचंद्र मुणगेकर	२०००-०१	४९ वे	प्राचार्य डॉ. रामेश्वर मा. भिसे	२०२६-२७
२५ वे	डॉ. अ.रा. पडोशी	२००१-०२			

मनुष्याणांम् वृत्तिरर्थः

मराठी अर्थशास्त्र परिषद

४९ वे वार्षिक अधिवेशन

१३, १४ व १५ नोव्हेंबर २०२६

बळवंत कॉलेज, विटा ता. खानापूर जि. सांगली

मराठी अर्थशास्त्र परिषदेचे विविध पारितोषिके

★डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ उत्कृष्ट ग्रंथ पारितोषिक (₹ १०००/-)

★ प्रा.मो.स.भावे पारितोषिक (अर्थसंवाद मधील उत्कृष्ट लेख) (₹ ५००/-)

★मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम महिला ग्रंथ पारितोषिक (₹ ११०००/-)

★प्रा. सौ.अरुणा रारावीकर स्मृती आर्थिक लेख पुरस्कार (वृत्तपत्रातरील लेख प्रथम ₹ १०००/- व द्वितीय पुरस्कार ₹ ५००/-)

★कै.ग.प्र. पिंपरकर पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोधनिबंध) (₹ १०००/-)

★प्रा. कांतीभाई ठक्कर ऋणमुक्ती प्रतिष्ठानचे डॉ. अमर्त्य सेन पारितोषिक (₹ ५००/-)

★ डॉ. शंकर मोडक पुरस्कार (₹ ५०००/-) ★ डॉ. रविंद्र सबनीस पारितोषिक (₹ ४०००/-)

★ डॉ.ज.फा. पाटील पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध विध्यार्थ्यासाठी) (₹२०००/-)

★ पद्मजा गंधे पारितोषिक (अधिवेशनात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध महिलांकरीता) (₹१०००/-)

★स्व. प्रा. भास्कर ढाले स्मृती पारितोषिक (संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ) पदव्युत्तर अर्थशास्त्र विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास (₹२०००/-)

★ कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर (अधिवेशन काळात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध महिलां आजीव सभासदाकरीता (₹ १५,०००.००)

★ कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर (अधिवेशन काळात सादर केलेला सर्वोत्कृष्ट शोध निबंध पुरुष आजीव सभासदाकरीता (₹ १५,०००.००)

परिषदेचे विविध उपक्रम

स्व. जमनालाल बजाज उपक्रम

डॉ.आर.एस.सोळुंके व्याख्यानमाला

टिळक महाराष्ट्र विद्यापीठ व्याख्यानमाला

डॉ. सुधा मोकाशी पुरुस्कृत (व्याख्यान) चर्चा सत्र

डॉ. नी.वि.सोवनी व्याख्यान (अधिवेशन काळात)

माजी अध्यक्षांचे योगदानाबाबत व्याख्यान (अधिवेशन काळात)

कै. मातोश्री भागुबाई चांगू ठाकूर स्मृती व्याख्यान

धुळे व्याख्यानमाला


श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला
मराठी अर्थशास्त्र परिषद
४८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
दि. २, ३ व ४ नोव्हेंबर २०२५


श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला
मराठी अर्थशास्त्र परिषद
४८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
दि. २, ३ व ४ नोव्हेंबर २०२५


श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला
मराठी अर्थशास्त्र परिषद
४८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
दि. २, ३ व ४ नोव्हेंबर २०२५


श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती द्वारा संचालित
श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला
मराठी अर्थशास्त्र परिषद
४८ वे वार्षिक राष्ट्रीय अधिवेशन
दि. २, ३ व ४ नोव्हेंबर २०२५









बुक–पोस्ट

* प्रेषक *

प्रा.डॉ.मारोती तेगमपुरे

कार्यवाह–खजिनदार, मराठी अर्थशास्त्र परिषद

संगाई, घर नं.२२, शहीद भगतसिंगनगर,

भालचंद्र पेट्रोल पंपामागे, पारनेर रोड, अंबड

जि.जालना – ४३१२०४, भ्रमध्वनी : ९४२३९९३१३७

प्रति,

_____

_____

_____